म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
१८६८



REFBK-0013670

३७८९३
भू. प्रवास
20.2.६५

# गोमंतक दर्शन

□ □

वा. ल. वझे

REFBK-0013670

एक रुपया

□ □

एकमेव विक्रेते
शिव प्रकाशन, नागेशी, पो. बांदिवडें, गोवा

गोवा पहावयास जाणाऱ्या प्रवाशांसाठी मार्गदर्शक

© १९६४
वासुदेव लक्ष्मण वझे

आवृत्ति पहिली
शके १८८६
सन १९६४

मूल्य : रु. १-००

प्रकाशक :
सौ. मंगला गाडगीळ
११९४ सदाशिव पेठ,
पुणें २.

एकमेव विक्रेते :
यशवंत लक्ष्मण वझे
शिव प्रकाशन
मु.नागेशी, पो.बांदिवडें
फोंडामार्गे, गोवा

कंपोज :
बाबर व भंडारी कं.
३४२ नारायण,
पुणें २

मुद्रक :
बा. रा. वर्तक
प्रशान्त प्रिंटिंग प्रेस
४६१/१ सदाशिव
पुणें २.

# निवेदन

निसर्गशोभेचा वरदहस्त लाभलेला गोमंतक पहाण्यासाठीं गोव्याबाहेरचे बरेच लोक येतात. प्रवासांत त्यांना योग्य मार्गदर्शन व्हावें व गोवा पाहिल्याचें समाधान लाभावें या हेतूनें मी हें 'गोमंतक दर्शन' लिहिलें आहे.

माझ्या मतें जरी मी यांत उणीवा राहूं न देण्याचा प्रयत्न केला असला तरी यांत उणीवा असणारच. तेव्हां पुस्तक हातीं घेऊन ज्या प्रवाशांनीं प्रवास केला आणि ज्यांना अडचणी आल्या व उणीवा भासल्या त्यांनीं पत्रद्वारें मला कळवावें. म्हणजे पुढच्या आवृत्तींत सुधारणा करतां येईल.

—लेखक

# प्रस्तावना

□ □

आपला गोमंतक हा अवघ्या १२०० चौरस मैल क्षेत्रफळाचा प्रदेश. पण या प्रदेशाविषयीं साऱ्या भारतांतच नव्हे तर सर्व जगांत आज असामान्य कुतूहल निर्माण झालेलें आहे. विशेषतः गेल्या ३ वर्षांत, म्हणजे गोमंतक स्वतंत्र झाल्यानंतर निसर्गसौंदर्य, इतिहास, विद्या, कला, शिल्प व संस्कृती इत्यादींनीं सुसंपन्न असलेल्या या प्रदेशाकडे सर्वांचीं मनें आकर्षिलीं जाऊं लागलीं आहेत. वर्षांतून जवळ जवळ आठ महिने प्रवाशांमुळें गोमंतक गजबजलेला दिसतो. गोमंतकांतील खानेसुमारी, आयात-निर्यात, भूपट्टीचें मोजमाप, पूर्व इतिहास, देवळें, चर्चेस, प्रेक्षणीय स्थळें यासंबंधीं माहिती देणारीं इंग्रजींत कांहीं पुस्तकें आहेत; परंतु प्रवाशांना उपयुक्त अशी माहिती देणारीं मराठी प्रकाशनें विरळाच.

श्री. वा. ल. वझे यांनीं लिहिलेली 'गोमंतक दर्शन' ही पुस्तिका सदर उणीव खचित भरून काढील असा मला विश्वास वाटतो. श्री. वझे हे स्वतः गोमंतकीय आहेत. प्रवाशांच्या सुखसोयीप्रमाणें त्यांच्या अडीअडचणींचाहि योग्य विचार करून श्री. वझे यांनीं जरुरीच्या माहितीचें अवघ्या दहा प्रकरणांत मोठ्या जिव्हाळयानें सुंदर व अर्थपूर्ण असें संकलन केलें आहे. या स्तुत्य उपक्रमाबद्दल मी श्री. वझे यांचें अभिनंदन करतों व त्यांच्या या प्रयत्नांना सुयश चिंतितों.

पणजी
१० नोव्हेंबर १९६४

**वि. सु. करमळी**
शिक्षणमंत्री गोवा.

# गोमंतक-दर्शन


- सर्वसाधारण माहिती ५
- प्रवासाचे टप्पे ६
- लोंढा ते मडगांव : रेल्वेनें ८
- मडगांव ते मुरगांव : मोटारीनें ११
- थोडक्यांत गोवा-दर्शन २२
- तालुकावार प्रेक्षणीय स्थळें २३
- प्रवासांतील सोयी-साधनें : माहिती २८
- विमान-बोट-मोटार : वेळापत्रक ३२
- ऐतिहासिक घडामोडी ३७
- राजकीय ३८

दोन नकाशे :

१. गोव्यांत येण्याचे मार्ग; २. गोमंतक (अंतर्गत)


□□□

संग्रहालय ठाणे स्थलप्रत
अनुक्रम ३७८८३
क्रमांक ३६९

# सर्वसाधारण माहिती

भगवान परशुरामांनीं सर्व पृथ्वी दान दिल्यावर दान दिलेल्या भूमींतच त्यांना स्वतःला राहवेना, म्हणून त्यांनीं आपल्या वास्तव्यासाठीं नवीन क्षेत्र निर्माण केलें. त्याला सुपाच्या आकारासारखा प्रदेश म्हणून शूर्पारक असें नांव मिळालें. शूर्पारक म्हणजे पश्चिम किनाऱ्यावरील आजचें आपलें कोंकण. या कोंकण-पट्टींतलाच गोमंतक.

अघनाशिनी ( जुवारी ) नदीच्या किनाऱ्यालगत गोमंत नांवाची टेकडी आहे. त्या टेकडीच्या भागांतच पहिली वस्ती वसली म्हणून, याला गोमंतक असें नांव मिळालें.

गोमंतक हें चंद्रकोरीच्या आकाराचें एक नंदनवन आहे.

गोमंतकाच्या उत्तरेस सावंतवाडी, दक्षिणेस कारवार, पूर्वेस सह्याद्रीच्या पंक्ति आणि पश्चिमेस सिंधुसागर ( अरबी समुद्र ) आहे.

पूर्वेस हिरव्यागार वनश्रीनें नटलेलीं विशाल सह्याद्रीचीं उत्तुंग शिखरें आणि पश्चिमेस अफाट निळा सागर या गोमंतकाच्या दोन सीमा.

सुंदर व स्वच्छ रस्ते; नारळी, आंबा, काजू, फणस यांसारखे कल्पवृक्ष; संथपणें वाहणारे पाण्याचे प्रवाह; पक्ष्यांच्या संगीतांत आणि निर्मळ झऱ्याच्या तालांत डोलणाऱ्या उंच उंच पोफळी; पाहुण्यांच्या स्वागतासाठीं केळ्यांचा लोंगर डोक्यावर घेऊन नम्र झालेल्या केळीं; मनाला पावित्र्य आणि नेत्रांना तृप्ति देणाऱ्या देवभूमि.

**हें गोमंतकांत सर्वत्र दिसणारें दृश्य :**

प्रत्येक हिंदूच्या घरासमोरील तुलसीवृंदावन आणि ख्रिश्चन नागरिकांच्या घरासमोरील क्रॉस यांमुळें या दोन संस्कृतींचा संगमच झाला आहे किंवा काय असें येथें वाटतें. या आणि अशा अनेक विषयांनीं नटलेला गोमंतक आहे.

गोमंतकांत यावयाचें झाल्यास विमान, आगनाव (बोट), लोहमार्ग (रेल्वे), मोटार यांपैकीं कोणत्याहि वाहनानें येतां येतें. लोंढा या जंक्शनवरून रेल्वेनें; मुंबईहून बोटीनें किंवा विमानानें; बेळगांव, सावंतवाडी, कारवार या भागांतून मोटारनें गोमंतकांत येतां येतें.

**गोमंतकाचें क्षेत्रफळ :** १३०० चौरस मैल.

**लोकसंख्या :** साडेसहा लाख.

**हवामान :**

| | जास्तींत जास्त | | कमींत कमी | |
|---|---|---|---|---|
| | सें. | फे. | सें. | फे. |
| जानेवारी ते मार्च | ३२·१ | ८९·८ | २१·१ | ७०·०० |
| एप्रिल ते जून | ३२·२ | ९०·० | २५·६ | ७८·१ |
| जुलै ते सप्टेंबर | २९·२ | ८४·६ | २३·८ | ७४·८ |
| ऑक्टोबर ते डिसेंबर | ३२·२ | ९०·१ | २१·९ | ७१·४ |
| वार्षिक | ३१·४ | ८८·५ | २३·० | ७३·४ |

**पाऊस :** ३०५ सें. मी. ते ३५६ सें. मी. जून ते सप्टेंबरपर्यंत.

**अकरा तालुके :**

गोव्याची विभागणी अकरा तालुक्यांत केली आहे. ते तालुके याप्रमाणें आहेत : पेडणें, बार्देस, डिचोली, सत्तरी, तिसवाडी ( गोवा ), फोंडें, सांगें, मुरगांव, साष्टी, केपें आणि काणकोण.

◻ ◻

## प्रवासाचे टप्पे

**प्रवासासाठीं टप्पे :** गोवा साधारणपणें व्यवस्थित पहावयाचा झाल्यास त्याकरितां प्रवासाचे कांहीं टप्पे ठरवावे लागतात. साधारणपणें ते टप्पे असे ठरवितां येतील : सावर्डें, मडगांव, फोंडा, जुनें गोवें, पणजी, म्हापसें, डिचोली, नेहरूनगर ( मुरगांव ).

## कोणत्या टप्प्यांत काय काय पहातां येईल :

### सांवर्डे

सांवर्डी बाजारपेठ; काकोर्डे येथील महादेवमंदिर व मारुतिगड; जांभावलीचा श्रीदामोदर; पारडें येथील चंद्रेश्वर भूतनाथ; रिवण येथील खाणी, पाण्याचे तलाव व चांदर स्टेशनकडील ऐतिहासिक अवशेष.

### मडगांव

मडगांव बाजारपेठ, चौगुले कॉलेज, बाणावली व कोलवा येथील समुद्रशोभा; शिरोडा येथील कामाक्षीमंदिर व श्रीशिवनाथमंदिर; बोरी येथील नवदुर्गा व सिद्धनाथावरील देखावा.

### फोंडा

मर्दनगड; ओप-खंडेपार येथील वॉटरवर्क्स, सफामशीद, कपिलेश्वर, शांतादुर्गा, रामनाथ, महालक्ष्मी, नागेश, श्रीनृसिंह, महालसा, मंगेश व माशेलचीं देवस्थानें.

### जुनें गोवें

चार चर्च; सप्तकोटेश्वर; दिवाडी बेट; पोर्तुगीज काळांतील व्हायसरॉयची कमान; रात्रीं मुक्काम पणजी.

### पणजी

पणजी शहर; दोनापावला ( किंवा धनपाल ); काब्र राजवाडा; आकाशवाणी केंद्र; धेंपे कॉलेज; आणि सध्यांचें सचिवालय किंवा जुना राजवाडा.

### म्हापसें

वेरें, रेईशमांगोश व आग्वाद किल्ले; कळंगूट येथील समुद्रकिनारा; साळगांवमार्गें रात्रीं म्हापसें शहरीं मुक्काम.

### डिचोली

म्हापशाहून सकाळींच निघून शिरगांव येथील चौगुले यांच्या मॅंगनीजच्या खाणी; लईराई देवस्थान; डिचोली येथील मातीच्या कामाचे नमुने; सांखळी येथील दत्तमंदिर व पांडुरंगाचें मंदिर; हरवळें येथील धबधबा; रात्रीं पुन्हां मुक्काम म्हापसें किंवा फोंडा.

## नेहरूनगर ( मुरगांव )

आगशी; कुठ्ठाळ; मुरगांव शहर, वास्को बंदर ( हार्बर ), दाभोळी विमानतळ; रात्रीं मुक्कामाला मडगांवला परत येतां येईल किंवा तेथूनच आगगाडीनें, विमानानें किंवा आगबोटीनें परत जातां येईल.

**सूचना :** या सर्व प्रवासांत हातांतील सूटकेसमधें किंवा पिशवींत राहील इतकेंच हलकें सामान बरोबर असावें. जास्त सामान असल्यास सामानासाठीं मागच्या मुक्कामास पुन्हां जावें लागेल. कांहीं टप्प्यांत निवास व भोजनाची व्यवस्था नसल्यामुळें रात्रीं मुक्कामाला पणजी किंवा मडगांव यांसारख्या मोठ्या शहरीं यावें लागतें. सोयीप्रमाणें कोणताहि टप्पा प्रथम घेता येईल.

मुरगांव येथील गोदी विभाग पहाण्यासाठीं सिक्युरिटी ऑफिसरकडे परवानगीसाठीं अर्ज करावा लागतो. तेथें जाऊन आयत्या वेळची निराशा टाळण्यासाठीं दोन-चार दिवस पूर्वीच अर्ज करून ठेवावा. दुपारीं १ ते २ जेवणासाठीं ही कचेरी बंद असते.

□□

## लोंढा ते मडगांव : रेल्वेनें

रेल्वेनें गोव्यांत येणें सोयीचें होईल. लोंढा जंक्शन झाल्यावर लागणारें स्टेशन कॅसलरॉक या ठिकाणीं पूर्वी तपासणी नाकें किंवा जकात-कचेरी होती. [त्या वेळीं प्रवाशांच्या सामानाची तपासणी होईतों गाडी या ठिकाणीं बराच वेळ थांबे. आतां तशी परिस्थिति नाहीं.

कॅसलरॉक स्टेशन सोडल्यावर घाटांतील खऱ्या उताराला सुरुवात होते. गोव्यांतला आगगाडीचा हा एकच मार्ग. हा लोहमार्ग १८१८ मध्यें बांधून पुरा झाला. या रस्त्याची लांबी कॅसलरॉकपासून मुरगांवपर्यंत ५६ मैल आहे. सह्याद्रीची उंची मागें टाकून भक् भक् करीत शिट्या वाजवीत गाडी उतार उतरूं लागली म्हणजे सह्याद्रीच्या कडेकपारींतून तो आवाज निनादत रहातो. एखाद्या खालच्या स्टेशनांतून वर येणारी गाडी फारच मजेशीर दिसते. एखादी खवळलेली अवाढव्य नागीण फुस्कारे टाकीत आपल्या अंगावर चालून येत नाहीं ना, असें वाटतें.

गोल गोल फिरत वनराजींतून वाट काढीत साडेसहा मैल खालीं आल्यावर गाडी थोडा वेळ थांबते, तें लहानसें स्टेशन करंझोळ. करंझोळनंतर मात्र पुढच्या दृश्याकडे लक्ष ठेवायला हवें. दूधसागराचा लपंडाव येथून सुरू होतो. प्रथम दूधसागर सह्याद्रीच्या अंगावरील पांढरा शुभ्र शेला असावा असें वाटतें. गाडी जसजशी पुढें जाते तसतसें या दूधसागराचें भव्य दर्शन होऊं लागतें. दूधसागराचें हें पाणी सह्याद्रीच्या कड्यावरून पांचशें फूट खालीं पडत असतें. पांढराशुभ्र दुधासारखा प्रवाह दिसतो म्हणून याला 'दूधसागर' असें म्हटलें आहे. दूधसागरावरील रेल्वे-पुलावर गाडी येतांच कांहीं भाविक मंडळी त्याच्या प्रवाहांत फळें-पैसे वगैरे अर्पण करतात.

दूधसागर स्टेशनानंतर दोन मैलांवर सोनावळी स्टेशन आहे. सोनावळीनंतर तीन-चार मैल यावें तों नारळी-पोफळींचे शेंडे उतरण संपत आल्याचें सांगतात. आणि मग थोड्याच वेळांत गाडी कुळें स्टेशनांत प्रवेश करते. लाल-लाल मातीचे रस्ते या स्टेशनाला येऊन मिळालेले दिसतात. या ठिकाणीं पूर्वी कुप्रसिद्ध पोर्तुगीज जकातनाकें होतें. येथून एक म्हापशाला आणि दुसरा पणजीला जाणारे असे दोन बसमार्ग आहेत.

कुळ्यानंतर कालें, सांवर्डें, कुडचडें अशीं स्टेशनें लागतात. रेल्वेनें येणाऱ्या प्रवाशांसाठीं प्रथम सांवर्डें हा टप्पा चांगला आहे. येथें भोजन-निवासाची ( लॉजिंग बोर्डींग ) सोय आहे.

मॅगनीजच्या व्यापारामुळें सांवर्डें या स्टेशनला बरेंच महत्त्व आलें आहे. स्टेशनपासून एक मैल अंतरावर असलेल्या काकोडें गांवीं श्रीमहादेवाचें दर्शन घडतें. सांवर्डें येथील गडावर मारुतीचें दर्शन घेतां येतें.

सकाळच्या वेळीं केपेंमार्गें पारोड्याला जाणाऱ्या बसनें पारोड्याला जावें. तेथील चंद्रनाथाच्या डोंगरावर चंद्रेश्वर व भूतनाथांचीं मंदिरें आहेत. चंद्रनाथाचा डोंगर चढण्यास साधारण तास–दीडतास लागतो. ह्याची समुद्र-सपाटीपासून उंची ११५२ फूट आहे. येथून सर्व गोमंतकाचें दर्शन घडतें. पायथ्याशीं शंखभैरवाचें छोटेंसें देऊळ आहे. शिखराच्या सपाटीवर चंद्रेश्वराचें व त्या मंदिराच्या डाव्या बाजूस श्रीभूतनाथाचें छोटेंसें देऊळ आहे. चंद्रेश्वर ही देवता फार प्राचीन समजली जाते. इतिहास संशोधकांच्या मतें सहाव्या शतकांत भोज घराण्यांतील चंद्रवर्मा राजानें हें मंदिर बांधलें असावें.

श्री. चंद्रेश्वराचें लिंग स्वयंभू असून चंद्रशिळेचें आहे. पूर्णचंद्राच्या किरणांनीं ही शिळा पाझरते असें म्हणतात. या दैवताची जत्रा चैत्र पौर्णिमेला होते. लयभास्कर खांप्रूजी पर्वतकर वगैरे कलाकारांची जन्मभूमि हीच.

डोंगर उतरून आल्या मार्गानें पुन्हां केपें येथें यावें आणि केप्याहून रिवणला जाणाऱ्या बसनें जांभावलीला यावें. थेट जांभावलीला जाणाऱ्याहि गाड्या मिळूं शकतात. न पेक्षां रिवणला जाणाऱ्या गाडीनें तिळामळ या थांब्यावर (स्टॉप) उतरून थोडें पायीं चालावें लागतें. जांभावलीच्या श्रीदामोदराला हिंदु व ख्रिश्चन समान श्रद्धेनेंच भजतात.

श्रीदामोदर हें दैवत मूळचें मडगांवचें. पोर्तुगिजांच्या बाटवाबाटवीच्या आणीबाणीच्या प्रसंगांत उपासकांनीं मूळ मडगांवचें लिंग हलविण्याचा प्रयत्न केला तेव्हां लिंगाचा वरचाच भाग त्यांच्या हातीं आला. तेवढाच भाग घेऊन ते जांभावली येथें आले. खालचा अवशेष अजूनहि मडगांवीं म्हाड्डु या भागांत आहे. मुख्य देवालयांत उजव्या बाजूनें श्रीलक्ष्मीनारायण व डाव्या बाजूनें श्रीदामोदर अशीं दैवतें आहेत. देवालयाच्या डाव्या बाजूनें श्रीरामनाथ मंदिर आणि उजव्या बाजूनें देवीचें मंदिर अशीं दोन मंदिरें आहेत. श्रीदामोदराची उत्सवमूर्ति फारच सुंदर आहे. जांभावली येथील शिमगोत्सव प्रसिद्ध आहे.

श्रीदामोदराचें दर्शन घेतल्यावर खनिजद्रव्याच्या खाणी, पोफळींच्या बागांची शोभा व निर्मळ पाणी पहावयाचें झाल्यास ऋषिवन म्हणजे रिवणाला जावें; आणि पुन्हां सावर्डें मुक्कामीं परत यावें.

सावर्ड्याहून मडगांवला येण्यासाठीं रेल्वेनें निघालें म्हणजे पहिलेंच स्टेशन साडेचार मैल अंतरावर चांदर म्हणून लागतें. सातव्या शतकांतील शिवमंदिराचे अवशेष आणि कदंबकालीन किल्ला, देवाची तळी, तसेंच इतर देवतांच्या मूर्ति, नंदी वगैरे येथें पहावयास मिळतें.

चांदरनंतर साडेपांच मैलांवर मडगांव स्टेशन आहे. मडगांवला मात्र बऱ्याच खानावळी आहेत. शुद्ध शाकाहारी अशी फक्त एकच ( स्वागत-लॉज किंवा भटाची खानावळ ) स्टेशनजवळ आहे. शिवाय इतर ठिकाणीं दोन्ही प्रकारचें – शाकाहारी व मांसाहारी – जेवण मिळतें. मात्र शाकाहारी असल्यास तसें स्पष्टपणें अगोदर सांगितल्यास तशी व्यवस्था होऊं शकते.

मडगांव शहराची लोकसंख्या १५,३६४ इतकी आहे. सर्व प्रकारच्या मालाची मोठी बाजारपेठ या शहरांत आहे. येथें नगरपालिका उद्यान, बाजारपेठ श्रीदामोदराचा तलाव, चौगुले महाविद्यालय, मोती टेकडीवर जाऊन शहराचा देखावा इत्यादि पहाण्यासारखें आहे.

मडगांवहून जवळच कोलवें व बाणावली या ठिकाणीं जाऊन समुद्रकिनारे पाहतां येतात. गांवांतून तिकडे जाणाऱ्या मोटारबसेस आहेत. किंवा दोन-तीन रुपयांत टॅक्सीदेखील जातात. मात्र आधीं भाडें ठरवूनच गोव्यांतील कोणत्याहि टॅक्सींत बसावें.

□□

# मडगांव ते मुरगांव : मोटारीनें

## श्रीकामाक्षी व श्रीशिवनाथ : शिरोडें

मडगांव शहर पाहून झाल्यावर पणजीला जाणाऱ्या बसनें बोरीच्या पुलाशीं शिरोडें येथील कामाक्षीमंदिर व श्रीशिवनाथाचें मंदिर पहावयाचें असल्यास उतरावें. ( गोव्यांतील बहुतेक सर्व मंदिरांची रचना जवळ जवळ सारखीच आहे, हें मात्र लक्षांत असावें ). बोरीचा जुवारी नदीवरील हा पूल गोमंतकांतील पुलांत सर्वांत जास्त लांबीचा आहे. पोर्तुगिजांनीं हा उद्‌ध्वस्त केला होता, परंतु स्वराज्यांत तो लगोलग पुन्हां उभारण्यांत आला.

## श्रीनवदुर्गा : बोरी

शिरोड्याला या पुलाकडूनच रस्ता गेला आहे. हा रस्ता थेट सांवर्ड्यापर्यंत आहे. येथून तीन मैलांवर शिरोडें आहे. सांवर्ड्याला जाणाऱ्या गाडींत बसून अथवा टॅक्सीनें शिरोडा येथें जाता येतें. शिरोड्याहून किंवा शिरोड्याला जावयाचें नसल्यास बोरीहून पणजीला येणाऱ्या गाडीनें श्रीनवदुर्गेच्या मंदिरापाशीं उतरावें. थांब्यापासून देवीचें देऊळ पायीं पांच मिनिटांच्या अंतरावर आहे.

बोरीच्या श्रीनवदुर्गेची मूर्ति कृष्णपाषाणाची आहे. स्वरूप महिषासुर-मर्दिनीचें आहे, दर नवमीला या देवीची पालखी निघते व त्रिपुरी पौर्णिमेला

यात्रा भरत असते. या गांवचें मूळचें नांव बदरीग्राम. देवीचें दर्शन घेतल्यावर तिथूनच सिद्धनाथ डोंगरावर जाण्याचा रस्ता आहे. या डोंगराची उंची १३५० फूट आहे. गोव्यांतील प्रमुख डोंगरांपैकीं हा एक आहे. येथून दिसणारा देखावा खूपच रमणीय आहे. वर श्रीसिद्धनाथाचें मंदिर आहे. थोडा वेळ वाटल्यास विश्रांति घ्यावी व डोंगर उतरून पुन्हां बोरीच्या मोटारथांब्यावर यावें व पुन्हां बस गांठून फोंडयाला जावें. येथून फोंडा अवघा मैल–सव्वामैल रहातो. फोंडा येथेंहि खाणावळी आहेत.

## मंदिरांचा तालुका : फोंडा

फोंडा तालुका हा सर्व गोमंतकाचें केंद्रस्थान आहे. सध्यां येथें आगपेट्यांचा कारखाना व टायरकारखाना आहे. तथापि लवकरच हें शहर औद्योगिक-दृष्ट्या भरभराटलेलें दिसेल अशी अपेक्षा आहे. बोरीच्या रस्त्यानें फोंड्यांत प्रवेश करीत असतांना लष्करी छावणी लागते. ही छावणी मर्दनगड या इतिहास-प्रसिद्ध किल्ल्याच्या पायथ्याला आहे. हा किल्ला सतराव्या शतकांत बांधला गेला. हा किल्ला संभाजी महाराजांनीं पोर्तुगिजांपासून मोठ्या शर्थीनें जिंकून घेतला; परंतु औरंगजेबाची मोठी फौज दक्षिणेंत चालून आल्यामुळें संभाजी महाराजांना पोर्तुगिजांचा पाडाव करण्यास पुरेसा अवधि मिळाला नाहीं.

फोंडा मोटारतळापासून पणजीला जाणाऱ्या रस्त्यालगत मुसलमानी अमदानींतील एक मशीद आहे. या मशिदीचें नांव सफ्फा मशीद. शाह अबदुल्लखान याचा दर्गा पण इकडे आहे.

फोंडा तालुका हा मंदिरांचाच तालुका म्हणण्यास हरकत नाहीं. फोंड्याच्या पंचक्रोशींतील देवळें हींच गोमंतकांतील पाहण्यासारखीं देवळें आहेत. हल्लींच बांदिवडें ते मंगेशी अशी बससर्व्हिस सुरू झाली आहे. या बसनें अथवा कांहीं देवस्थानें पायींसुद्धां जाऊन पहातां येतात. टॅक्सीनें पण सर्व देवस्थानें पहाणें शक्य आहे.

## श्रीकपिलेश्वर : फोंडा

फोंडा ते नागेशी अशीं ओळीनें पांच देवालयें लागतात. फोंड्याच्या कोर्टा-कडून अवघ्या फर्लांगाच्या अंतरावर श्रीकपिलेश्वराचें मंदिर आहे. प्राचीन-काळीं कपिल नांवाच्या राजानें याची स्थापना केली.

## श्रीशांतादुर्गा : कवळें

श्रीकपिलेश्वराचें दर्शन घेऊन पुढें म्हणजे त्याच दुर्भाटाच्या रस्त्याला अर्ध्या फर्लांगावर उजव्या बाजूनें दोन बाजूंनीं दोन खांब असलेला रस्ता दिसेल. त्या रस्त्यानें कवळें येथील सुप्रसिद्ध श्रीशांतादुर्गेला यावें. तलावाकडून मंदिराच्या आवारांत प्रवेश करावा. गोमंतकांत देवालय म्हटलें म्हणजे शेजारीं जलाशय हा असावयाचाच.

श्री छत्रपति सरकारचे मंत्री नारो राम शेणवी रेगे यांनीं हें मंदिर अठराव्या शतकांत बांधलें. दर पंचमीला या देवीची पालखी निघत असते. या देवीची जत्रा माघ महिन्यांत शुद्ध प्रतिपदेपासून पंचमीपर्यंत मोठ्या प्रमाणावर चालते. गोमंतकांत या देवालयाचें शिखर प्रसिद्ध आहे. आवारांत मंदिराच्या मागच्या बाजूनें ठेवलेलीं श्रीचीं वाहनें अवश्य पहावींत. त्याचप्रमाणें देवालयांत ठेवलेल्या देवाला ओंवाळावयाच्या आरत्या पण पाहून घ्याव्यात.

### देवालयांत जाणाऱ्यांसाठीं महत्त्वाची सूचना

गोमंतकांतील देवालयांचें वैशिष्ट्य म्हणजे शांतता, स्वच्छता व टापटीप. देवालयांत प्रवेश करतेवेळीं शांतताभंग वा कोणत्याहि प्रकारें तेथील पूज्य भावना व पावित्र्य यांचा भंग होणारें कृत्य दर्शनाला येणाऱ्यांच्या हातून होऊं नये. पुजारी वा व्यवस्थापक यांच्या परवानगी-शिवाय उगीचच आंत आंत जाण्याचा प्रयत्न करूं नये. उड्या मारून मोठमोठ्यानें घंटांचा आवाज करूं नये. इच्छा असल्यास देवाच्या प्रसादाच्या ताटांत पैसे ठेवावेत. न ठेवल्यास आग्रह मुळींच होणार नाहीं. येथें कोणतेंहि देवकृत्य केल्यास त्याची छापील पावती मिळत असते. देवस्थानांत देवकृत्यासाठीं जमा झालेल्या पैशांची सर्व नोकरवर्गास त्याच्या त्याच्या कामाप्रमाणें विभागणी होत असते. देवस्थानचे पुजारी आपणांस तीर्थ व फुलांचा प्रसाद देतात आणि जिज्ञासेनें विचारलेली माहिती पण पुरवूं शकतात.

## श्रीरामनाथ : बांदिवडें

कवळ्याहून एका फर्लांगावरच श्रीरामनाथाचें देवस्थान लागतें. श्रीरामनाथ म्हणजे प्रभु रामचंद्रांनीं सेतु बांधण्याच्या वेळीं स्थापन केलेलें श्रीरामेश्वरच. या देवाचें मूळचें गांव लोटली.

गाभाऱ्यांत वरच्या बाजूनें श्रीनारायण, मध्यभागीं श्रीरामनाथ, उजव्या बाजूच्या मंदिरांत श्रीकामाक्षी व डाव्या बाजूच्या मंदिरांत श्रीशांतेरी आणि बाहेरील मंडपाच्या उजव्या बाजूनें वेताळ अशा देवता आहेत. बाहेरील नव्या पद्धतीचा मंडप पणजी येथील सुप्रसिद्ध मांडवी हॉटेलचे मालक श्री. केणी यांनीं दहा-बारा वर्षांपूर्वींच बांधला. रामनाथाच्या देवळांत प्रवेश करतांना लागणारा नगारखाना गोमंतकांत प्रसिद्ध आहे.

## श्रीमहालक्ष्मी : बांदिवडें

श्रीरामनाथाचें दर्शन घेऊन आल्या सडकेनें जरा पुढें जातांच उजव्या बाजूनें एका लहानशा पुलावरून दोन्ही बाजूंनीं शेती असलेला रस्ता दिसेल. त्या रस्त्यानें पुढें येतांच नारळीच्या उंच शेंड्यांमधून श्रीमहालक्ष्मी मंदिराचें शिखर चमकतांना दिसेल. नारळीच्या या बागेंतून अथवा त्याच रस्त्यानें पुढें येऊन या मंदिरांत येतां येईल.

श्रीमहालक्ष्मीची मूर्ति कोल्हापूरच्या महालक्ष्मीसारखीच आहे. या मंदिराचें सभागृह मोठें व प्रशस्त आहे.

मडगांवजवळील कोळवें हें मूळचें या देवीचें गांव. गाभाऱ्यांत उजव्या-बाजूनें श्रीनारायणाची मूर्ति आहे. आवारांत रवळनाथ, बाव्ळेश्वर व देवीच्या अगदीं समोर सट्टो-फट्टो अशीं तीन मंदिरें आहेत. सट्टो-फट्टो हे दोन नाविक. बाटवाबाटवीच्या वेळीं देवीला सुरक्षितपणें या स्थळीं त्यांनीं आणली.

श्रीमहालक्ष्मीची पालखी प्रत्येक अष्टमी–चतुर्दशीला निघत असते. शिवाय नवरात्र, रामनवमी वगैरे उत्सव होत असतात. श्रीमहालक्ष्मी ही इतर संस्थानांच्या भक्तांची पालवी देवी आहे. ( पालवी म्हणजे इष्टदेवता )

## श्रीनागेश : बांदिवडें

श्रीमहालक्ष्मी मंदिराकडून एका फर्लांगावरच श्रीनागेशाचें मंदिर आहे. श्रीनागेशाचा तलाव प्रसिद्ध आहे. पूर्वीं श्रीनागेशाचें प्रतिबिंब या पाण्यांत

दिसत असे. पण समोर कठडा बांधल्यामुळें आतां हें प्रतिबिंब दिसत नाहीं. फक्त संध्याकाळच्या वेळीं गाभाऱ्यांतील दिवे मात्र तलावांत स्पष्ट दिसतात.

गोमंतकांतील बहुतेक दैवतांचें बाटवाबाटवीच्या वणव्यांत स्थलांतर झालें, पण त्याला अपवाद फक्त श्रीनागेशाचा. या ठिकाणीं चौदाव्या शतकांतील मराठी भाषेंतील शिलालेख आहे. श्रीनागेश हें बांदिवड्याचें ग्रामदैवत आहे.

श्रीनागेश म्हणजे शंकर असून या देवाची उत्सवमूर्ति मात्र मराठा सरदारी वेषांतीलच आहे. कारण याचे कांहीं भक्त छत्रपतींचे सरदार होते. पेशवा सरकारकडून या दैवताला राजचिन्हें पण अर्पण केलेलीं आहेत.

श्रीनागेशाच्या उजव्या बाजूनें श्रीलक्ष्मीनारायण व डाव्या बाजूनें श्रीसिद्धि-विनायक आहेत. देवळाच्या डाव्या बाजूला श्रीमंत सौंधेकर राजे यांचा राजवाडा आहे. सौंधेकर हे मूळचे कर्नाटकांतील शिरशी सौंधा येथले. टिपू सुल्तानाच्या भयानें ते इकडे आले. गोव्यांतील कांहीं तालुके यांच्याकडे होते ते पोर्तुगिजांनीं आपल्या ताब्यांत घेतले आणि सौंधेकरांना त्याबद्दल खंडणी देऊं केली. अजूनहि सौंधेकर दरमहा ६०० रुपये खंडणी सरकारकडून घेत असतात.

कवळें येथील शांतादुर्गा व बांदिवड्यांतील तीन देवळें पाहून झालीं. आतां बेलिंग येथील श्रीनृसिंह व प्रियोळ येथील महालसा आणि श्रीमंगेश पहाण्या-साठीं पुढें जावयाचें. बांदिवड्याहून निघणाऱ्या बसची वेळ टळून गेली असल्यास श्रीनागेश मंदिरामागच्या रस्त्यावर येऊन डाव्या बाजूनें फर्मागुढीवर यावें. हा दोन फर्लांग चढणीचा रस्ता आहे. फर्मागुढी हा बांदिवड्याचा बस-थांबा (स्टॉप) आहे. फर्मागुढीवर श्रीगणपति मंदिर आहे. आतांचें नवें मोठें मंदिर गोव्याचे मुख्य मंत्री श्री. दयानंदराव बांदोडकर यांनीं अलीकडेच बांधलें. (श्री. बांदोडकरांचा गांवहि बांदिवडेच.) फर्मागुढीवरील हा गणपति रानांत गुरें चारायला नेणाऱ्या गुराख्यांनीं फार वर्षांपूर्वी स्थापन केला. नवसाला पावणारा म्हणून या गणपतीची प्रसिद्धि आहे.

## श्रीनृसिंह : वेलिंग

फर्मागुढीवरून पणजीला जाणाऱ्या बसनें वेलिंगच्या पुलाजवळ उतरावें. नंतर पुलाजवळून गेलेल्या रस्त्यानें पुढें जावें. फर्लांग-दीडफर्लांग चालल्यावर श्रीवेताळेश्वराच्या देवळासमोर आपल्या डाव्या बाजूनें दोन कमानी दिसतील.

त्या पहिल्या कमानींतून पुढें जावें. तेथील तलाव पाहूनच आपल्या श्रमांचा परिहार होईल. गोमुखांतून वाहणारा झरा आपल्या मनाला आनंद देईल. येथील श्रीनृसिंहाचें मंदिर लहान असलें तरी टुमदार आहे.

श्रीनृसिंहाचें गोव्यांतील मूळचें स्थान ( शंखावली ) सांकवाळ. श्रीनृसिंहाचें चिन्ह शिवलिंगासारखेंच आहे; पण नृसिंहाचे भक्त तो स्तंभ म्हणून मानतात. वैशाखांतील नृसिंहजयंतीला या देवाची जत्रा होत असते.

## श्रीमहालसा : मार्दोळ

श्रीनृसिंहाचें दर्शन घेतल्यावर आल्या मार्गानें परत फिरून मुख्य रस्त्याला यावें. वेलिंगच्या छोट्या पुलाकडूनच मार्दोळची बाजारपेठ दिसेल. या बाजार-पेठेंतूनच मंदिराकडे रस्ता गेला आहे.

श्रीमहालसा म्हणजे मोहिनी. समुद्रमंथनानंतर अमृताची वांटणी करीत असतांना श्रीविष्णूंनीं घेतलेलें जगत्सुंदरीचें रूप. या देवीचें मूळ स्थान वरुणापूर ( वर्णे ). गाभाऱ्यांत मध्यभागीं श्रीमहालसा आणि आवारांत मूळ-पुरुष, गणपति, काळभैरव, लक्ष्मीनारायण, शांतादुर्गा वगैरे परिवारदेवता आहेत. माघ शुद्ध षष्टि ते दशमीपर्यंत या देवीची जत्रा भरत असते. विजयरथांतून देवीची मिरवणूक ही या जत्रेंतील महत्त्वाची मिरवणूक असते.

मार्दोळहून पुन्हां मुख्य रस्त्यानें पुढें जात असतांना उजव्या बाजूनें डोंग-राच्या पायथ्याशीं जाईचे मळे दिसतील. संपूर्ण गोमंतकांत बहुधा फुलांची निर्यात इकडूनच होत असते. गोव्यांतील कुकळयें येथील स्वादिष्ट अननसाला जवळची अशी बाजारपेठ मार्दोळच.

## श्रीमंगेश :

मार्दोळच्या बाजारापासून अवघ्या अर्ध्या-पाऊण फर्लांगावर मुख्य रस्त्याच्या डाव्या बाजूनें 'श्री संस्थान मंगेश' अशीं अक्षरें असलेली कमान दिसेल. त्या कमानींतून पुढें जावें. गोव्यांतील मुख्य देवस्थान तें हेंच. श्रीमंगेश, श्रीशंकर हे स्मशानांत रहाणारे विरागी, तपस्वी; पण इकडचे हे शंकर कुबेराचे मित्र आहेत. गोव्यांत श्रीमंगेशाचें मूळचें स्थान कुशस्थली, कुठ्ठाळ. गर्भागारांत मध्यभागीं श्रीमंगेशाचें लिंग, सभागृहाच्या उजव्या बाजूनें श्रीगणपति, दुसऱ्या बाजूनें श्रीभगवती आणि सभागृहांतच ग्रामपुरुषाची दगडी मूर्ति आहे. याच

मूर्तीला कौल लावण्यांत येतो. मागच्या बाजूनें श्रीमूळकेश्वर आहे. मूळकेश्वर म्हणजे एक गुराखी. प्रथम श्रीमंगेशाचा शोध त्यानें लावला.

कवळ्याप्रमाणेंच देवळाच्या मागील बाजूस असलेलीं याहि देवाचीं वाहनें अवश्य पहावींत. श्रीमंगेशाची दर सोमवारीं पालखी निघत असते. माघी पौर्णिमेला या देवाची जत्रा असते.

श्रीमंगेशाचें दर्शन घेतल्यावर पुन्हां मुख्य रस्त्यावर यावें आणि पणजीला जाणाऱ्या बसमध्यें बसावें.

## श्रीदेवकी-कृष्ण : माशेल

माशेल येथें बरींच लहान मोठीं देवस्थानें आहेत. तीं पहावयाचीं असल्यास भाणस्तारच्या पुलाजवळ उतरून माशेलला जाणारी गाडी पकडावी. माशेलमध्यें श्रीदेवकीकृष्णाचें मंदिर प्रसिद्ध आहे. शिवाय श्रीशांतादुर्गा, श्रीभगवती आणि जवळच खांडोळें येथें श्रीगणपति इत्यादिकांचीं मंदिरें आहेत.

गोमंतकांत अशीं लहानमोठीं मिळून दीडशेंवर देवस्थानें आहेत.

मंगेशीहून पुढें निघाल्यावर जी मोठी चढण लागते तिला कुंडईची घाटी असें म्हणतात. ती चढण संपल्यावर लागणारा गांव कुंडई, नंतर भोम व भाणस्तार. भाणस्तार येथील मडकई नदीवरील पूल पण पोर्तुगिजांनीं उडविला होता. भाणस्तारला गुरुवारीं रात्रीं आठवड्याचा फार मोठा बाजार भरत असतो.

आतां आपला फोंड्याचा टप्पा संपला आहे. पणजीला जाणाऱ्या मोटारीनेंच पुढें जावें लागेल.

## चर्चेस् : जुनें गोवें

जुन्या गोव्याला येतांच मोठमोठीं भव्य ख्रिस्ती प्रार्थनामंदिरें किंवा चर्चेस् दिसतील तिथें उतरावें. पहिलेंच चर्च अगदीं रस्त्यालगतचें तें बोम जेजू यांचें चर्च आहे. याची लांबी १८७ फूट, रुंदी ५७ फूट आणि उंची ६३ फूट आहे. १६०५ मध्यें हें चर्च बांधलें गेलें.

या चर्चमध्यें एकंदर दहा वेदी (Altar) आहेत व दोन्ही बाजूंनीं बाप्तिस्मा म्हणजे ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याच्या जागा आहेत. मध्यभागच्या वेदीवर हातांत दंड असलेला रुपेरी पुतळा आहे. हाच सेंट फ्रांसिस झेवियरचा पुतळा. इ. स. १६८३ मध्यें कौंट ऑफ आल्व्होर हा पोर्तुगीज व्हायसरॉय असतांना

गोव्यांत पोर्तुगीज सरकारविषयीं तिटकारा निर्माण होऊन प्रजेंत बंडाळी माजली. त्या वेळीं व्हायसरॉयनें हा राजदंड या पुतळ्याच्या हातांत देऊन पोर्तुगीज सत्ता गोव्यावर स्थिर रहावी अशी प्रार्थना केली आणि त्या काळांत पोर्तुगीज सत्तेचा बचाव झाला, असा समज आहे. सेंट झेवियरच्या हातची ती यष्टि म्हणजे गोव्यावरील ' परचक्र ' निवारण करणारी अमोघ दैवी शक्तीच असा विश्वास पोर्तुगिजांचा होता. याच चर्चमध्यें झेवियरचें शव आहे. तीन डिसेंबर हा येथील जत्रेचा महापर्वणीचा दिवस.

दुसरें चर्च कॅथिड्रल म्हणजे बिशप असलेलें खिस्ती मंदिर. हें चर्च एका मशिदीवर १५३३ मध्यें बांधलें गेलें. याची लांबी २०० फूट, रुंदी १८० फूट व उंची १५० फूट आहे.

तिसरें चर्च १५१७ मध्यें एका मशिदीवरच बांधलेलें आहे. प्राचीन बांधकाम व शिल्पशास्त्राचा हा एक उत्कृष्ट नमुना आहे.

सेंट काझेतान याचें चर्च अगदीं नदीकिनारीं आहे. चर्चच्या तळघरांत आर्च बिशप आणि व्हाइसरॉय यांचीं शवें औषधी द्रव्यें घालून ठेवलीं आहेत, असें सांगतात. या चर्चमधून कांहीं हिंदु देवतांच्या मूर्ति पण दिसतील. याच्या मध्यभागीं एक विहीर आहे. या विहिरीचें पाणी औषधी आहे. श्रीमहादेवाच्या देवळावरच हें चर्च बांधलें गेलें आहे.

फेरी बोटीच्या धक्क्याजवळच एक कमान आहे. फार पूर्वीं पोर्तुगीज व्हायसरॉय याच कमानींतून प्रथम गोव्यांत प्रवेश करी, म्हणून याला ( आर्कु म्हणजे कमान ) ' आर्कु द व्हिसेरैय ' असें म्हणतात.

## सप्तकोटेश्वर : नार्वे-दिवाडी

दिवाडी बेटावरील फार प्राचीन असें सप्तकोटेश्वराचें मंदिर पहावयाचें असल्यास पणजी किंवा जुन्या गोव्याहून फेरी बोटीनें नार्वे येथें जावें. कदंबकाळांत सप्तकोटेश्वर देवस्थानची फार मोठी भरभराट झाली. कदंबकाळच्या नाण्यांत व ताम्रपटांत सप्तकोटेश्वराचा उल्लेख आहे. सप्तकोटेश्वराचें लिंग सप्त धातूचें असून याला सप्तनाथ असेंहि म्हणतात.

तेथून फेरी बोटीनें अगर पुन्हां जुनें गोवें येथें येऊन पणजीच्या गाडीनें पणजीला यावें. जुनें गोवें या टप्प्यांत रहाण्या-जेवण्याची व्यवस्था ( लॉजिंग बोर्डिंग ) नसल्यामुळें शक्य तों पणजीस मुक्कामास यावें.

पणजीला जातांना वाटेंत रायबंदर हें गांव लागतें. रायबंदर येथें सरकारी रुग्णालय आहे. रायबंदर गांवानंतरचा देखावा पहाण्यासारखा असतो. डाव्या बाजूनें शेती व मिठागरें व उजव्या बाजूनें मांडवी नदीचें विस्तीर्ण पात्र. सतत एक मैलपर्यंत आपल्याला हें रमणीय दृश्य दिसत असतें.

## पणजी

पणजी ही मांडवी नदीवर वसलेली गोव्याची राजधानी आहे. पणजींत प्रवेश केल्यावर आपल्याला मांडवी नदींत लहानमोठ्या होड्या व गलबतें दिसतील. पलीकडे आग्वादचा किल्ला व वरच्या डोंगरावरील लहान लहान घरें दिसतील. वरच्या बाजूनें जो डोंगर दिसतो आणि लहानमोठीं घरें दिसतात त्याच भागांत गोव्याचें आकाशवाणी केंद्र, पेट्रियार्क पॅलेस व धेंपे कॉलेज आहे.

मोटारतळाजवळच मुख्य टपाल कचेरी व तार कचेरी आहे. त्याच्यापुढें न्यायालय आणि सचिवालय आहे. सचिवालयाच्यापुढें कांहीं मोठीं दुकानें, मांडवी हॉटेल आणि पोलिस हेडक्वार्टर्स लागतात.

पणजींत बऱ्याच चांगल्या खानावळी ( लॉजिंग बोर्डिंगस् ) आहेत. मात्र त्यांत केवळ शाकाहारी अशीं दोन–तीनच. आपणांस पसंत असलेल्या हॉटेलमध्यें उतरून पणजी शहर पाहून घ्यावें.

पणजीहून तासातासानें बससर्व्हिस असलेलीं दोन प्रेक्षणीय स्थळें म्हणजे दोना पावला ( धनपाल ) आणि मिरामार. मिरामार येथें समुद्रकिनाऱ्यावरील दृश्य संध्याकाळच्या वेळीं नारळांच्या झाडांमुळें फारच मनोहर वाटतें. मिरामार हें धनपालला जाणाऱ्या रस्त्यानें करंजळें या गांवीं लागतें. मिरामारहून थोडें पुढें गेल्यावर दोन रस्ते लागतील. उजव्या बाजूचा रस्ता काब या गव्हर्नरच्या निवासस्थानाकडे आणि धनपाल या प्रेक्षणीय स्थळाला गेला आहे. धनपालला फेरी बोटीनें पण जातां येते. धनपाल या स्थानालाच जुनें पोर्तुगीज नांव दोना पावला असें आहे.

दुसरें किनाऱ्याचें स्थान गाशपार दिअश. हें पणजीपासून साडेतीन किलोमीटर आहे. जानेवारी ते मे महिन्यांत सायंकाळचे चार ते नऊपर्यंत बसची सोय तें स्थान पाहून येण्यास चांगल्या प्रकारें केलेली आहे.

## म्हापसा

पणजीहून फेरी बोटीनें मांडवी नदीच्या दुसऱ्या किनाऱ्याला म्हणजे बेती येथें जावें. बेतीहून अर्ध्या-पाऊण मैलाच्या अंतरावर असलेल्या वेरें या गांवीं जावें. त्या ठिकाणचा रेईश मांगोश हा किल्ला पहावा. हा किल्ला मांडवीच्या उजव्या किनाऱ्यावर इ. स. १५५१ मधें बांधला. या ठिकाणीं एक चर्च आहे. पूर्वीचें तें विठोबाचें मंदिर होतें. या किल्ल्यावरून मांडवींतून पुढें जाणाऱ्या बोटींची शोभा पहात असतांना वेळ कसा जातो हेंच समजत नाहीं.

यानंतर इतिहासप्रसिद्ध आग्वाद किल्ला पाहण्यासाठी वेऱ्याहून कांदोळीमार्गें मोटारीनें आग्वादला यावें. नेरूलहून पण होडीनें आग्वाद किल्ल्याला येतां येतें.

आग्वादचा किल्ला इ. स. १६१२ सालीं रुईद ताव्होरा या पोर्तुगीज व्हाईसरॉयनें बांधला. याची उंची समुद्रसपाटीपासून ८० मिटर आहे. फार वर्षांपूर्वी होडीवाले पिण्याचें पाणी या किल्ल्यावरून घेत असत. पोर्तुगीज भाषेंत पाण्याला आग्व म्हणतात. आग्व म्हणजे पाणी देणारा, म्हणून याला आग्वाद असें नांव मिळालें. आग्वाद येथील कैदखान्यांत स्वातंत्र्य संग्रामांत भाग घेत-लेल्या वीरांना ठेवण्यांत आलें होतें. आग्वादचा किल्ला पाहिल्यावर कानोळीला येऊन कळंगुट या गांवीं मोटारनें पोहोंचावें. उंच झाडांच्या सावलींत शुभ्र अशा रेतीवर बसून कळंगुटचा समुद्रकिनारा पहावा. रात्रीच्या वेळीं तारकांचें प्रतिबिंब या पाण्यांत पडलें असतांना आकाशच या पाण्यामधें उतरल्यासारखें वाटतें. या किनाऱ्यावरील बंगले एप्रिल-मे महिन्यांत भाड्यानें मिळूं शकतात. उन्हा-ळ्यांत तर हा समुद्रकिनारा मुंबईची प्रतिचौपाटीच बनतो.

कळंगूटहून म्हापशाला जाणाऱ्या टॅक्सी, बस सारख्या जात-येत असतात. व्हायापरी या गांवाहून जाण्यापेक्षां साळगांवहून जावें म्हणजे त्या वाटेंतील शोभा पहात म्हापशाला केव्हां पोंचलों हें समजत नाहीं.

म्हापसा हें बार्देसमधील मोठें शहर आहे. दर शुक्रवारीं या ठिकाणीं मोठा बाजार भरत असतो. या ठिकाणीं बऱ्यापैकीं एक-दोन खानावळी आहेत.

## डिचोली

म्हापशाहून सकाळच्या वेळीं निघावें. कारण पुढच्या टप्प्यांत निवासस्थानाची म्हणजे रहाण्या–जेवण्याची सोय नाहीं. पुन्हां निवासाकरितां म्हापशाला किंवा

फोंड्याला यावें लागेल. म्हापसा ते सांखळी जाणाऱ्या मोटारीनें निघून रस्त्याच्या दुतर्फा असलेली झाडी, शेती, घरें पहात पहात अस्नोडा गांवीं यावें. मँगनिजच्या खाणी पहावयाच्या असल्यास अस्नोड्याहून शिरगांव येथें यावें. गोव्यांतील प्रसिद्ध उद्योगपति श्री. चौगुले यांच्या खाणी इकडे आहेत.

येथें जवळच असलेलें श्रीलईराई देवीचें देऊळ पाहून घ्यावें. या लईराईची जत्रा वैशाख शुद्ध पंचमीला भरत असते. शेंकडों धोंड ( भक्त ) या दिवशीं पेटत्या निखाऱ्यावरून चालत जाण्याचें दिव्य येथें त्या दिवशीं करीत असतात.

शिरगांवहून डिचोलीला यावें. येथें काजूचा कारखाना आहे. कुंभाराच्या कलाकृति पण या ठिकाणीं पहाण्यासारख्या आहेत. डिचोलीहून बसनें सांखळीला जावें. सांखळीला नदीच्या एका तीराला श्रीदत्तमंदिर व पलीकडे श्रीपांडुरंगाचें प्राचीन (चारशें वर्षांचें) मंदिर आहे तें पहावें. सांखळी हें पोर्तुगीज सत्तेविरुद्ध वारंवार बंड करणाऱ्या राण्यांचें गांव.

सांखळीहून हरवळें येथें येऊन येथील धबधबा, पांडवलेणीं व शिवमंदिर पहावें. या धबधब्याचें पाणी ६० फूट उंचीवरून पडत असतें. येथील वातावरण किती प्रसन्न आहे त्याची प्रत्यक्षच पाहिल्याशिवाय कल्पना येणार नाहीं. उगीचच श्रीशंकर इकडे येऊन तपाला बसले नाहींत ! महाशिवरात्रीला या ठिकाणीं मोठी यात्रा भरत असते.

सत्तरी तालुक्यांत तसें विशेष कांहीं पहाण्यासारखें स्थान नाहीं. पण निसर्गानें मात्र बराचसा हिस्सा या तालुक्याला दिलेला आहे. पोफळीच्या बागा या तालुक्यांत बऱ्याच आहेत. चौदाव्या शतकांतील ब्रह्मदेवाची एक पाषाणमूर्ति करंबळी या गांवीं आहे. हें गांव वाळपईपासून ७ किलोमिटर आहे.

वाळपई हें या तालुक्याचें मुख्य स्थान आहे. वाटल्यास हरवळें येथूनच वाळपईला जाऊन तो भाग पहावा. सांखळीहून फोंडामार्गें पणजीस आल्यास उसगांव व तेथील पूल आणि ओपा, खंडेपार वगैरे गांवें पहावयास मिळतील.

## मुरगांव

आतां राहिलें वास्को शहर. गोव्यांतील बहुतेक तालुक्यांतून आपला प्रवास झाला. रहातां राहिले पेडणें व काणकोण तालुके. या तालुक्यांत विशेषसें

पहाण्यासारखे नाहीं. गोव्यांतून परत जातांना जर आपणास गोकर्ण, कारवार, अंकोला वगैरे पहावयाचें असेल तर आपल्याला वाटेंत काणकोण लागेलच.

पणजीहून मुरगांवला जाण्यासाठीं पणजीच्या मोटारतळावरून अर्ध्या-अर्ध्या-तासानें आगशीला ( किंवा अक्षी ) जाणाऱ्या गाड्या सुटत असतात. ही गाडी काळापूरवरून जाते. काळापूर गांव आल्यावर गाडी डोंगरघाट चढूं लागते. वाटेंत बांबोळी गांव लागतें. या ठिकाणीं गोवा आकाशवाणीचें ट्रान्समिटिंग स्टेशन आहे. तिथून गाडी शिरदोणवरुन आगशीच्या खाडीपाशीं येते. वाटेंत थोरलें गोवें येथें उतरून पायीं पांच मिनिटांच्या अंतरावर असलेलें पिलार हें महत्त्वाचें चर्च पहावें. हें पूर्वी महादेवाचें मंदिर होतें. येथील व्यवस्था खिस्ती मिशिनऱ्यांकडे आहे.

आगशी या गांवच्या जमिनींत रेती भरपूर असल्यामुळें तेथें वांगीं, रताळीं, मुळा वगैरे भाजीपाला बऱ्याच प्रमाणांत होतो. पिलार पाहून झाल्यावर जुंवारी नदींतून लाँचनें कुट्ठाळीला यावें. हेंच श्रीमंगेशाचें पूर्वीचे स्थान. कुट्ठाळीला लाँचच्या धक्क्यावरच मोटारतळ आहे. तिथून वास्कोला बसनें अथवा टॅक्सीनें जावें. वास्को, मुरगांव, मार्मागोवा आणि हल्लींचें नेहरूनगर हीं एकाच गांवाची नांवें आहेत. नुसतेंच 'हार्बर' म्हटलें कीं, मुरगांव किंवा मार्मागोवा बंदर असा अर्थ समजावयाचा. प्रत्यक्ष वास्को शहरापासून बंदरापर्यंतचें अंतर दीड मैल तरी असेल.

मुरगांव शहराची रचना आधुनिक पद्धतीनें करण्यांत आली आहे. या भागाचे अधिकार नौदलाच्या हातीं आहेत.

वास्कोहून बंदरावर ( हार्बर ) रेल्वेनें अथवा मोटारीनें जावें. हें पश्चिम किनाऱ्यावरील सर्वांत मोठें नैसर्गिक महत्त्वाचें बंदर आहे. मोठमोठ्या विदेशी बोटींत शेंकडों टन माल येथें चढविला जातो. वास्को शहरांत किनाऱ्यावर बर्माशेल आणि एसो कंपनीचे मोठमोठे तेलसांठे आहेत. वास्कोहून दाभोळी विमानतळ पहाण्यासाठीं टॅक्सीनें जाणें जास्त उपयुक्त ठरेल.

अशा तऱ्हेनें गोमंतकांतील प्रेक्षणीय स्थळें पाहून पुन्हां रेल्वेनें अथवा मोटारीनें आपल्या मुक्कामाला परत जातां येतें. ( मोटार, विमान, रेल्वे, बोट यांचीं वेळापत्रकें या पुस्तकांत इतरत्र दिलेलीं आहेत, तीं पहावींत. )

# थोडक्यांत गोवा-दर्शन

वर दर्शविलेल्या मुक्कामाप्रमाणें गोवा पहाण्यास आठ दिवस तरी लागतील. सर्वांनाच आठ दिवस गोव्यांत रहातां येईल असें नाहीं. त्यासाठीं तीन दिवसांत व दोन दिवसांत कांहीं प्रमुख स्थानें पाहून घेतां येतील. म्हणून खालीं तशी योजना दाखविली आहे.

**तीन दिवसांत गोवादर्शन :**

**पहिला दिवस :**

मडगांव, फोंडा व फोंडाभागांतील प्रमुख देवस्थानें व फोंड्याला मुक्काम.

**दुसरा दिवस :**

जुनें गोवें येथील चर्चेस् व पणजी शहर पाहून तेथेंच मुक्कामाला.

**तिसरा दिवस :**

म्हापसा शहर, सांखळी-देवस्थानें, वास्को बंदर एवढें तीन दिवसांत पाहून त्याच दिवशीं रेल्वेनें किंवा मोटारीनें परत फिरतां येईल.

**दोन दिवसांत गोवादर्शन :**

**पहिला दिवस :**

वास्कोला उतरून प्रथम वास्को बंदर, नंतर मडगांव व फोंडा महालांतील प्रमुख सात देवस्थानें.

**दुसरा दिवस :**

पणजी शहर, म्हापसा शहर, सांखळींतील देवस्थानें पाहून रात्रीं परत फिरण्याच्या मुक्कामास हजर होतां येईल.

□□

# तालुकावार प्रेक्षणीय स्थळें

**गोवा (तिसवाडी) तालुका :**

१. धनपाल (दोनापावला) पणजीहून बससर्व्हिस सकाळीं ८ वाजल्यापासून रात्रौ ७॥ पर्यंत तास तासाच्या अंतरानें असते.

२. गाशपार दिअश चौपाटी (बीच)–पणजीपासून ३॥ किलोमिटर. जानेवारी ते मे महिन्यांत सायंकाळीं ४ ते ९ पर्यंत बससर्व्हिसची सोय आहे.

३. दिवाडी बेट–पणजीपासून १३ किलोमिटर. या ठिकाणीं जाण्यासाठीं पणजी ते दिवाडी अशी फेरी करणारी लॉंच आहे. त्याच लॉंचनें दिवाडीवरील नार्वे येथील सप्तकोटेश्वर पहातां येईल. सुमारें पांचसहा तासांचा हा प्रवास आहे.

## बार्देस तालुका :

पणजीहून फेरी बोटीनें बेती येथें आल्यावर हीं स्थळें २५ किलोमिटरच्या परिसरांत आहेत. बस सर्व्हिसनें अथवा स्पेशल टॅक्सी करून जातां येईल.

१. बागा, २. कळंगुट किनारा, ३. पोंबुर्पा झरा, ४. कळंगुटजवळील वागतर किनारा, ५. कानोळी ओर्डा झरा, ६. आग्वादचा किल्ला.

## डिचोली तालुका

पणजीहून फेरी बोटीनें बेतीला येऊन तेथून बसनें किंवा टॅक्सीनें :

१. हरवळें येथील धबधबा, २. मयें येथील तळें, ३. सांखळींतील देवस्थानें.

## फोंडा तालुका

फोंड्याला मुक्काम; किंवा पणजीहून बसनें अथवा टॅक्सीनें :

१. खंडेपार येथील ओप वॉटर वर्क्स, २. मर्दनगड, ३. सिद्धनाथ, ४. सात देवस्थानें, ५. सफ्फा मशिद.

## सांगें तालुका

रिवणतलाव मडगांवपासून २४ किलोमिटर. वाटेंत तिळामळ येथें उतरून श्रीदामोदराचें दर्शन घेतां येईल. मडगांवहून बससर्व्हिस आहे.

## सासष्टी तालुका

१. कोलवा किनारा, २. बाणावली किनारा.

हे दोन्ही किनारे मडगांवपासून ६ किलोमिटरवर आहेत. बसनें किंवा टॅक्सीनें जातां येतें.

३. केळशी झरा–मडगांवहून मोटाररस्त्यानें १५ किलोमिटर.

४. चंद्रेश्वर भूतनाथ – मडगांवहून टॅक्सी किंवा बसनें. पायथ्यापर्यंत ११ किलोमिटर अंतर जायला बसनें २५ मिनिटें लागतात.

## गोमंतकांतील प्रमुख देवालयें

| तालुका | देवस्थान व गांव | जत्रा |
|---|---|---|
| फोंडा | श्रीमंगेश–प्रियोळ | : माघ शुद्ध पौर्णिमा |
| ,, | श्रीशांतादुर्गा–कवळें | : माघ शुद्ध पंचमी |
| ,, | श्रीरामनाथ–बांदिवडें | : माघ महाशिवरात्र |
| ,, | श्रीमहालक्ष्मी ,, | : चैत्र शुद्ध नवमी |
| ,, | श्रीनागेश ,, | : चैत्री पौर्णिमा |
| ,, | श्रीमहालसा–मार्दोळ | : माघ शुद्ध दशमी |
| ,, | श्रीनृसिंह–वेलिंग | : वैशाख शुद्ध पौर्णिमा |
| फोंडा | श्रीकामाक्षा–शिरोडें | : महाशिवरात्र |
| ,, | श्रीदेवकीकृष्ण–माशेल | : पौषी-पौर्णिमा |
| केपें | श्रीदामोदर–जांभावली | : शिमगोत्सव-फाल्गुन |
| गोवा | श्रीसप्तकोटेश्वर | : महाशिवरात्र |
| सांखळी | श्रीदत्त–सांखळी | : मार्ग. शुद्ध १४ दत्तजयंती |
| ,, | श्रीकालिका–कासरपाळ | : आश्विन शु. १ ते ९ नवरात्र |

## वेताळ–नावें

मुख्य दैवतांबरोबरच परिवार-दैवतांत वेताळ किंवा रवळनाथ ही देवता असते. रवळनाथ व वेताळ हे श्रीशंकराचे गण आहेत. मार्दोळजवळ प्रियोळ या गांवीं भव्य वेताळ पहावयास मिळेल.

## प्रमुख चर्चेस

| | |
|---|---|
| १. चर्च ऑफ अवर लेडी ऑफ इमॅक्युलेट कन्सेप्शन | : पणजी |
| २. ,, ,, ,, ,, ,, मिराक्लस | : म्हापसा |
| ३. चर्च ऑफ द होली घोस्ट | : मडगांव |
| ४. चर्च ऑफ द राचोल | : राचोल |
| ५. चर्च ऑफ द चिंचिणी | : चिंचिणी |
| ६. चर्च ऑफ सांतु आंद्रें | : वास्को |
| ७. चर्च ऑफ द अवर लेडी पिलार | : पिलार |
| ८. चर्च ऑफ द अवर लेडी ऑफ सांत आना | : तळवली सांतान |
| ९. चर्च ऑफ द त्रियेदाद | : दिवाडी बेट |

## चर्चच्या प्रसिद्ध जत्रा

| | गांव | दिनांक |
|---|---|---|
| १. फेस्त ऑफ द रेईश | : मांगोश वेरें-बार्देस | : ६ जानेवारी |
| २. अवर लेडी कंदेलशि | : पोंबुर्पा | : २ फेब्रुवारी |
| ३. जेजूस द नाझरेणें (पणजीमार्गें आगशीला जात असतांना बांबोळी झाल्यावर आडवा फांटा शिरधनला गेला आहे.) | : शिरधन | : ... |
| ४. अवर लेडी मिराकल्स | : म्हापसा | : ईस्टरनंतर १६ दिवस |
| ५. फेश्तिव्हल ऑफ नोव्हिदादीश | : बहुतेक सर्व शहरांत | : २४ ऑगस्ट |
| ६. सांतु फ्रॅंसिस्कु | : जुनें गोवें | : ३ डिसेंबर |

## मशिदी व दर्गे

| | |
|---|---|
| १. सप्फा मशिद | : फोंडा |
| २. जामा मशिद | : सांगें |
| ३. नमजगा | : डिचोली |
| ४. अबदुलशहाचा दर्गा | : फोंडा |
| ५. मदुरशहाचा दर्गा | : कुकळ्ळी |

## शैक्षणिक आणि सांस्कृतिक संस्था

| | |
|---|---|
| १. इन्स्टिटयुट मिनेझिस ब्रांगाझा | : पणजी |
| २. नॅशनल लायब्ररी | : पणजी |
| ३. गोवा मेडिकल कॉलेज | : पणजी |
| ४. हिस्टॉरिकल आरकाइव्ज | : पणजी |
| ५. धेंपें महाविद्यालय | : पणजी |
| ६. साळगांव सेमिनरी | : साळगांव (बार्देस) |
| ७. पिलार सेमिनरी | : पिलार |
| ८. राचोल सेमिनरी | : राचोल (सासष्टी) |
| ९. चौगुले महाविद्यालय | : मडगांव |
| १०. शॉव्हियर कॉलेज | : बस्तोडा (बार्देस) |
| ११. गव्हर्मेंट पॉलिटेक्निक | : पणजी |

### प्रमुख कारखाने :

**मडगांव :** १. कार्बोलिक ॲसिड आणि ऑक्सिजन गॅस, २. मेणबत्त्या, ३. टायर सोल फॅक्टरी.

**फोंडा :** १. काड्याच्या पेटीचा कारखाना, २. टायर सोल फॅक्टरी.

**हळदोण :** स्पिनिंग मिल.

**डिचोली :** १. काजू कारखाना, २. साबण कारखाना, ३. मंगलोरी कौलें कारखाना, ४. तिळेच्या वस्तु तयार करण्याचा कारखाना, ५. कुंभार-काम.

### इतर :

गोवा आणि दारू : गोव्यामध्यें दारूबंदी नाहीं. असें असूनहि दारू पिऊन रस्त्यांत दंगामस्ती करणारा गोमंतकीय सहसा दिसणार नाहीं.

देवदासी : इतर प्रांताप्रमाणेंच एके काळीं इकडेहि वेश्याव्यवसाय चालू होता. परंतु गोव्यांत आतां या समाजांत बरीच वैचारिक क्रांति झाली असून या प्रथेचें बऱ्याच प्रमाणांत उच्चाटन झालें आहे.

### धार्मिक संघर्ष :

गोव्यांत हिंदु, ख्रिश्चन व मुसलमान अशा धर्मांचे लोक आहेत. परस्परांच्या श्रद्धास्थानांबद्दल सर्व धर्मीयांच्या लोकांत आदर असून ख्रिश्चन हिंदु देवतांना भजतात; तर कांहीं हिंदुहि ख्रिश्चन देवांच्या जत्रेंत त्या दैवताला केलेले नवस फेडतात. मोहरमच्या ताबुतांसाठीं हिंदु व ख्रिश्चन वर्गणी स्वखुषीनें देतात.

### गोव्यांतील आंब्याच्या नामांकित जाती :

मानकुर (सर्वांत उत्तम), फेर्नांदिन, कुलास, मांगिलार, मालदेस, शांवियेर, बाबयो, मुसराद (हलवा व वड्यांसाठीं उत्तम.)

### केळ्यांच्या जाती :

रसबाळें (सर्वांत उत्तम), सालदाटें, सांवरबोंडें (तळलेले काप करण्यास उत्तम), मयडोळें (हलव्यासाठीं प्रसिद्ध).

### जेवणांतील नमुनेदार रुचकर पदार्थ :

खतखतें, उडदमेथी, मुगाच्या गांठी, गणगणें (गूळ व नारळाचें दूध घालून केलेली डाळीची गोड खीर).

**रुचकर मासळी :**

सुंगट, शेवटा ( ही मासळी उन्हाळ्यांत त्यांतल्यात्यांत अतिशय रुचकर ) विसवण, करळी, बांगडा ( ही मासळी वाळवून ठेवतात.)

मयडें येथील मयडोळें केळें, कुकळ्याचें अननस, खोलची मिरची, साळगांवची मोठी चवळी ( आळसांदे ) या वस्तु गोव्यांत रुचकर म्हणून प्रसिद्ध आहेत.

### उत्पन्न

नारळ, सुपारी, आंबा, काजू, फणस, पपनस, अननस, केळीं, पपई, कोकम.

**प्राणिज :** मासळी, कातडें.

**खनिज :** मॅंगनीज, अशुद्ध लोखंड, चुनखडी.

समुद्र व नद्या यांच्या कांठीं मिठाचें पण बरेंच उत्पन्न होतें.

□ □

# प्रवासांतील सोयी-साधनें : माहिती

## लॉजिंग बोर्डिंग-खानावळी

**पणजी :**

| | टेलिफोन | भोजन फराळासह-दर सिंगल | डबल |
|---|---|---|---|
| १. मांडवी हॉटेल | ४०३ | रु. ३० ते ८० | रु. ५५ ते १३५ |
| २. नटराज रेस्ट हाऊस | | रु. १० | रु. १५ |
| ३. श्री रामेश्वर लॉज | | रु. १० | रु. १२ |
| ४. गुजरात लॉज | ६३१ | रु. १० | रु. १६ |
| ५. इंदिरा निवास | – | रु. १० | रु. १२ |
| ६ न्यू गुजरात लॉज | – | रु. १० | रु. १२ |
| ६. भारत लॉज | – | रु. ५ | रु. ६ |

यांपैकीं रामेश्वर, न्यू गुजरात, गुजरात आणि भारत हीं केवळ शाकाहारी आहेत. तसेंच यांतील फक्त पहिलें म्हणजे मांडवी हॉटेल हें युरोपियन पद्धतीचें असून बाकी सर्व भारतीय पद्धतीचीं आहेत.

## गेस्ट हाऊस

| | | | |
|---|---|---|---|
| १. हॉटेल रिव्हियर | ५१८ | रु. १० | रु. १७ |
| २. पेनसांव सेण्ट्रल | ५६६ | रु. १० | रु. १५ |
| ३. इंपेरिअल पेनसांव | – | रु. १० | रु. ८ |
| **मडगांव :** | | | |
| १. टुरिस्ट हॉटेल | – | रु. ५ | रु. ७ |
| २. गोकुळा | – | रु. ५ | रु. ६ |
| ३. हॉटेल दुर्गा | – | रु. ४ ते ५ | रु. ६ |
| ४. स्वागत लॉज | – | रु. ५ | रु. ६ |
| ५. पेनसांव रिअल | – | रु. ६ | रु. १० |
| ६. दामोदर लॉज | – | रु. ६ | रु. १० |
| **म्हापसा :** | | | |
| १. पौर्णिमा | – | रु. ८ ते १५ | – |
| २. पेनसांव मापुसा | – | रु. ४ | रु. ८ |
| **वास्को :** | | | |
| १. हॉटेल जुवारी (युरोपियन पद्धत) | ७३ | रु. २५ ते २८ | रु. ४६- |
| २. गोवा गेस्ट हाऊस | – | रु. १२ | रु. २० |
| ३. प्रवासी | – | रु. १२ | रु. १६ |
| ४. आदर्श लॉज | – | रु. ५ | रु. ६ |

**सावर्डें :**

कलिया हॉटेल

संग्रहालय, ठाणे, स्थापना
दि ...........
क्रमांक .................... दि ....

**फोंडा :**

१. बर्वे लॉजिंग बोर्डिंग

२. कीरा गेस्ट हाऊस

**याशिवाय सरकारी नोकरांसाठीं :**

एम्. ई. एस्. बंगला–टेलिफोन नं. ३६९

मुलकी किंवा लष्करी अधिकारी (म्हैसूर राज्य) रु. १–५० प्रत्येक माणशीं.

मुलकी किंवा लष्करी अधिकारी रु. २-०० प्रत्येक माणशीं

मडगांव येथील गव्हर्मेंट गेस्ट हाऊसच्या रिझर्वेशनसाठीं डायरेक्टर पी. डब्ल्यू. डी. पणजी ( फोन नं. २४२ ) या पत्त्यावर पत्रव्यवहार करावा. या ठिकाणीं ५ खोल्या आहेत. त्याचें भाडें याप्रमाणें आहे :

| | | | |
|---|---|---|---|
| खोली | क्र. | १, २ आणि ४ | रु. ३-५० प्रत्येक दिवसास. |
| ,, | ,, | ५ | रु. ४-०० ,, |
| ,, | ,, | ३ | रु. ३ एका माणसास प्रत्येक दिवशास. |
| | | | रु. ५-५० दोन माणसें प्रत्येक दिवसास. |

पणजी येथें ३४ खोल्यांचें सर्किट हाऊस नवीनच झालें आहे.

**शिपिंग कंपन्या व एजंट :**

१. सिंधिया स्टीम नेव्हिगेशन कंपनी ( प्रा. ) लि.

२. बॉम्बे स्टीम नेव्हिगेशन कं. ( प्रा. ) लि.

३. शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लि.

एजंट : व्ही. एस. अँण्ड कं. लि. टे. नं.

तार : DEMPO } मुरगांव (हार्बर) २६ / पणजी ३५७

४. ब्रिटिश इं. स्टीम नेव्हिगेशन लि.

५. पी. अँण्ड ओ. एस्. नेव्हिगेशन कंपनी

एजंट : जनरल एजन्सी लि, वास्को

तार : GENAGENCY वास्को ४८.

६. लावरो ( Lauro ) लाइन्स :

एजंट : व्ही. मणेरकर-वास्को

**एअर लाइन्स ( हवाईमार्ग ) :**

१. इंडिया एअर लाइन्स कॉर्पोरेशन

एजंट : रावराजे देशप्रभु-पणजी : ६६३

## प्रवासी संस्था

| | गांव | टेलिफोन नंबर |
|---|---|---|
| १. मिनेझिस एअर ट्राव्हेल लि. | : पणजी | ७१२ |
| तार : COSMEZ | : वास्को | ६४ |
| २. एइर मुंडियल लि. | : पणजी | ४११ |
| | : मडगांव | ४६ |
| तार : AEROMUNDIAL | : वास्को | २६ |
| ३. ट्रेड विंग्ज प्रा. लि. | | |
| तार : TRADEWINGS | : वास्को | ४८ |
| ४. व्ही. एस. डेंपो आणि कं. लि. | : पणजी | ३५७ |
| तार : DEMPO | : | |

**विशेष माहितीसाठीं :** डिपार्टमेंट ऑफ टूरिझम, आल्फान्सो द अल्बुकर्क स्ट्रीट, पणजी (गोवा). टेलिफोन : कचेरी ६५७; संचालक ६३५.

तार : TOORISM GOA

**उद्याने :**

पणजी : १. बाग प्रासिस्कु लुईज गोमेज
: २. म्युनिसिपल गार्डन "ग्रासीअ द ओर्ता"
: ३. चिल्ड्रेन्स पार्क (कांपाळ)

मडगांव : १. म्युनिसिपल गार्डन "जॉर्ज ब्रारेतो"
२. आगाखान पार्क

वास्को : १. म्युनिसिपल गार्डन

म्हापसा : १. ,, ,,

## चित्रपटगृहें

१. नॅशनल थिएटर–पणजी, २. ई एल् दोराद–पणजी, ३. मेट्रोपॉल–मडगांव, ४. लता–मडगांव, ५. वास्को–वास्को, ६. आयशा–फोंडा, ७. हिरा टॉकिज–डिचोली.

### रुग्णालयें

| | गांव | टेलिफोन नं. |
|---|---|---|
| १. सेंट्रल हॉस्पिटल | पणजी | ५४६ |
| २. रायबंदर हॉस्पिटल | रायबंदर | ६२८ |
| ३. मेन्टल हॉस्पिटल | पणजी | ४४७ |
| ४. सेक्रेड हार्ट ऑफ मेरीज हॉस्पिटल | मडगांव | ६४ |
| ५. टी. बी. हॉस्पिटल | सांतुइमेज | ५३२ |
| ६. ,, ,, ,, | मडगांव | – |
| ७. सेंट्रल लेप्रोझरी | माखझन ( साष्टी ) | |

### बँका

| | |
|---|---|
| १. स्टेट बँक ऑफ इंडिया | : पणजी, मडगांव, वास्को, म्हापसा |
| २. सेंट्रल बँक ऑफ इंडिया लिमिटेड | : पणजी |
| ३. बँक ऑफ इंडिया लि. | : मडगांव, वास्को |
| ४. बँक ऑफ बडोदा लि. | : वास्को |
| ५. चार्टर्ड बँक लि. | : वास्को |
| ६. कॅनरा बँक लि. | : पणजी, वास्को |
| ७. बँक ऑफ महाराष्ट्र | : मडगांव, पणजी |
| ८. गोवा स्टेट को. ऑ. बँक | : पणजी, म्हापसा, मडगांव, फोंडा. |

□ □

# विमान-बोट-मोटार : वेळापत्रक

### विमान वाहतूक :

मुंबई ते गोवा विमानाचा फक्त सव्वा तासाचा प्रवास आहे. रोज खालीं दिलेल्या वेळापत्रकाप्रमाणें विमानवाहतूक चालू असते.

| | | | |
|---|---|---|---|
| निघतें मुंबईहून | १४–२०; | निघतें दाभोळीहून | १६–१५ |
| पोचतें दाभोळीला | १५–४०; | पोचतें मुंबईला | १७–३५ |
| निघते मुंबईहून | १६–१० | पोंचते दाभोळीला | १७–३० |
| निघते दाभोळीहून | १६–२० | पोंचते मुंबईला | १९–०० |

### आगबोटीनें :

खालीलप्रमाणें वेळापत्रक असलें तरी भरती-ओहोटीमुळें या वेळांत फेरफार होत असतो. पावसाळ्यांत बोटी बंद असतात.

**बी. एस्. एन्. कं. ( प्रा. ) लि. :**

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| निघते | मुंबईहून | रविवारीं | आणि | बुधवारीं | सकाळीं | १०–०० |
| पोचते | पणजीला | सोमवारीं | ,, | गुरुवारीं | ,, | ७–१५ |
| निघते | पणजीहून | ,, | ,, | ,, | ,, | १०–०० |
| पोंचते | मुंबईला | मंगळवारीं | ,, | शुक्रवारीं | ,, | ७–१५ |

**एस्. एस्. एन्. कं. ( प्रा. ) लि. :**

| खालीं | | | | वर | | |
|---|---|---|---|---|---|---|
| गुरुवारीं | निघते | १६–०० | मुंबई | पोचते | गुरुवारीं | ४–०० |
| शुक्रवारीं | पोचते | ७–०० | वास्को | निघते | बुधवारीं | १४–०० |
| ,, | निघते | १३–०० | ,, | पोचते | बुधवारीं | ०९–३० |

वाटेंत कारवार, भटकळ, मालपे, आणि मंगळूर हीं बंदरें करते.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| रविवारीं | पोंचते | ०६–०० | कोचीन | निघते | रविवारीं | २३–६० |

### बस-सर्व्हिस :

पणजी-बेळगांव अनमोडमार्गें १५७ किलोमिटर. पणजीहून बेळगांवला गेल्यावर आगगाडी मिळते. त्या सोयीनेंच या गाड्यांचें वेळापत्रक ठरविलें आहे.

| पणजीहून | बेळगांवला |
|---|---|
| सकाळी ७–३० वाजतां निघते | दुपारीं १२–३० पोंचते |
| ,, ९–०० ,, ,, | दुपारीं १४–३० ,, |
| ,, ११–३० ,, ,, | सायंकाळीं १७–३० ,, |

| बेळगांवहून | पणजीला |
|---|---|
| सकाळी ८–०० वाजतां निघते | दुपारीं १४–४५ पोंचते |
| ,, १०–२० ,, ,, | सायंकाळीं १७–१५ ,, |
| ,, ११–२० ,, ,, | ,, १८–१५ ,, |

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



............ ... विः ....... ..........

क्रमांक .......... ........... नों दि ..............

## म्हापसा-बेळगांव अनमोडमार्गें १७० किलोमिटर

| म्हापशाहून | बेळगांवला |
|---|---|
| सकाळी ८-०० वाजतां निघते | दुपारीं १४-१५ पोंचते |
| ,, १०-०० ,, ,, | सायंकाळीं १६-१५ ,, |

| बेळगांवहून | म्हापसाला |
|---|---|
| सकाळीं ९-३० वाजतां निघते | दुपारीं १५-४५ पोंचते |
| ,, १२-३० ,, ,, | दुपारीं १८-४५ पोंचते |

## बेती-पुणें दोडामार्गमार्गें ४५४ किलोमिटर

| | |
|---|---|
| बेतीहून सकाळीं ७-३० निघते; | पुण्याला दुपारीं २२-४० पोंचते |
| पुण्याहून पहांटे ५-३० ला निघते; | बेतीला दुपारीं २२-२० पोंचते |

## पणजी-हुबळी अनमोडमार्गें १८० किलोमिटर

| | |
|---|---|
| पणजीहून सकाळीं ९-३० ला निघते; | हुबळीला दुपारीं १७-४५ पोचते |
| हुबळीहून ,, १०-०० ला निघते; | पणजीला ,, १७-३० पोचते |

## मडगांवहून-हुबळी अनमोडमार्गें

| | |
|---|---|
| मडगांवहून सकाळीं ९-०० ला सुटते | हुबळीला दुपारीं ६१-३० पोचते |
| हुबळीहून ,, ११-०० ला ,, | मडगांवला ,, १८-३० पोंचते |

## बेती ते मुंबई दोडामार्ग मार्गें ६४३ किलोमिटर

| | |
|---|---|
| बेतीहून पहाटे ४-०० ला सुटते | मुंबईला रात्रीं २३-३० ला पोंचते |
| मुंबईहून ,, ४-०० ला ,, | बेतीला रात्रीं २३-३० ,, ,, |

## मडगांव-सदाशिवगड काणकोणमार्गें ७० किलोमिटर

| मडगांवहून | | | सदाशिवगडला | | |
|---|---|---|---|---|---|
| सकाळीं | ७–०० | सुटते | सकाळीं | ९–४५ | पोंचते. |
| ,, | ८–०० | ,, | ,, | १०–४५ | ,, |
| ,, | ९–३० | ,, | ,, | ११–१५ | ,, |
| ,, | १०–०० | ,, | दुपारीं | १२–४५ | ,, |
| दुपारीं | १२–०० | ,, | ,, | १४–४५ | ,, |
| ,, | १२–४५ | ,, | ,, | १५–३० | ,, |
| ,, | १५–३० | ,, | ,, | १८–१५ | ,, |
| ,, | १६–३० | ,, | ,, | १९–१५ | ,, |

## सदाशिवगड ते मडगांव

| सदाशिवगडाहून | | | मडगांवला | | |
|---|---|---|---|---|---|
| सकाळीं | ६–२० | निघते | सकाळीं | ९–०५ | पोंचते. |
| ,, | ८–०० | ,, | ,, | १०–४५ | ,, |
| ,, | ११–०० | ,, | दुपारीं | १३–४५ | ,, |
| दुपारीं | १३–०० | ,, | ,, | १५–४५ | ,, |
| ,, | १३–३० | ,, | ,, | १६–०० | ,, |
| ,, | १४–३० | ,, | सायंकाळीं | १७–१५ | ,, |
| ,, | १६–०० | ,, | ,, | १८–४५ | ,, |
| ,, | १७–३० | ,, | रात्रीं | २०–१५ | ,, |

## वास्को ते सदाशिवगड १०० किलोमिटर

वास्कोहून दुपारीं १४–०० निघते; सदाशिवगडला सायंकाळीं १७–३० पोंचते.

सदाशिवगडाहून सकाळीं ९–०० निघते; वास्कोला दुपारीं १२–३० ,,

## वास्को–मडगांव–बेळगांव लोंढामार्गें १४२ किलोमिटर

| निघते | पोंचते | पोंचते |
| --- | --- | --- |
| मडगांव सकाळीं ७–३० | लोंढा दुपारीं १२–०० | बेळगांव दुपारीं १३–३० |
| वास्को दुपारीं १–३० | ,, सायंकाळीं १८–०० | ,, सायंकाळीं १९–३० |
| बेळगांव सकाळीं ७–१५ | ,, सकाळीं ८–४५ | वास्को दुपारीं १४–३० |
| बेळगांव दुपारीं १३-३० | ,, दुपारीं १५–०० | मडगांव सायंकाळीं १९-३० |

बसचा दर साधारणपणें मैलीं सात पैसे किंवा किलोमिटरला ५ पैसे आहे.

## आगगाडी

वास्को ते पुणें रोज ' जनता ' जात–येत असते.

वास्को ते पुणें अंतर ५८१ किलोमिटर

| ( गाडी क्रमांक २०५ ) | | | ( गाडी क्रमांक २०६ ) | |
| --- | --- | --- | --- | --- |
| निघते | ७–१० | वास्को | पोंचते | १५–५५ |
| निघते | ८–०० | मडगांव | निघते | ८–१० |
| पोंचते | ११–२० | कॅसलरॉक | निघते | ११–५८ |
| निघते | १२–५८ | ,, | पोंचते | १०–५५ |
| पोंचते | १४–१५ | लोंढा | निघते | १०–१० |
| निघते | १५–०५ | ,, | पोंचते | ९–३० |
| पोंचते | १६–१५ | बेळगांव | निघते | ८–१३ |
| निघते | १७–२८ | ,, | पोंचते | ७–५५ |
| पोंचते | ०५–०० | पुणें | निघते | २०–४० |

## मार्मागोवा ( हार्बर ) बंदर ते लोंढा १५० किलोमिटर

| ( गाडी क्रमांक ९८२ ) | | | ( गाडी क्रमांक ९८१ ) | |
| --- | --- | --- | --- | --- |
| निघते | १७–१५ | (हार्बर) बंदर | पोंचते | ९–०० |
| पोंचते | १७–२५ | वास्को | निघते | ८–५० |
| निघते | १७–३५ | ,, | पोंचते | ८–४० |
| निघते | १८–३० | मडगांव | निघते | ७–१० |
| पोंचते | १९–२० | कॅसलरॉक | निघते | ३–४५ |
| निघते | २०–५८ | ,, | पोंचते | ३–३० |
| पोंचते | ००–३० | लोंढा | निघते | २–५० |

### स्थानिक वाहतूक :

येथें दर्शविलेल्या प्रवासाच्या टप्प्यांच्या ठिकाणच्या मुख्य रस्त्यांवरून दर अर्ध्या तासानें साधारणपणें एक बस जात-येत असतेच. शिवाय उत्तम प्रकाच्या टॅक्सीसुद्धां मिळूं शकतात. त्यांचा दर साधारणपणें असा आहे :

मीटर असलेल्या टॅक्सी—

४० पैसे पहिल्या किलोमिटरला.

१० पैसे नंतरच्या प्रत्येक किलोमिटरला.

मीटर नसलेली टॅक्सी—

३५ पैसे प्रत्येक किलोमिटरला.

( वरच्याप्रमाणें जरी दर असले तरी टॅक्सींत बसतांना प्रथम भाडें ठरवूनच बसावें हें उत्तम. )

□ □

# ऐतिहासिक घडामोडी

सूतसंहितेंत ७ योजनें विस्तीर्ण असलेलें गोवापुरी नांवाचें क्षेत्र असल्याचा उल्लेख आहे.

आनीता भार्गवेणैव गोमंताख्ये च पर्वते ।
मांगिरीशो महादेवो महालक्ष्मीश्च म्हालसा ॥

असा उल्लेख सह्याद्रिखंडांत आहे

इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून गोमंतकाचा सुसंबद्ध इतिहास सांपडतो. दुसऱ्या पुलकेशीचा थोरला मुलगा चंद्राधित्य हा इ. स. ६०० च्या सुमारास गोवा व गोव्यालगतच्या भागांत सामंत नेमला गेला.

आठव्या शतकापासून ११ शतकापर्यंत गोवा मालखेड राष्ट्रकूटांच्या आधिपत्याखालीं शिलाहारांच्या ताब्यांत होता.

११ व्या शतकांतच गोवा कंदबांच्या आधिपत्याखालीं आला.

इ. स. १२४७ मध्यें षष्टदेव व कामदेव यांनीं गोवेश्वराचें देऊळ बांधलें. तेंच आजचें पिलार.

१३०९ मध्यें अल्लाउद्दिन खिलजीचा सरदार मलिक काफूर यानें दक्षिणेवर स्वारी करून गोवा लुटला.

१३४७ सांत हसनगंगूनें गोव्यावर स्वारी केली; कदंबांचा पराभव.

१३६७ ते १४७० पर्यंत गोवा विजयनगरच्या आधिपत्याखालीं होता.

१४७० मध्येंच बहामनी राज्याच्या महंमद गवानानें गोव्यावर स्वारी केली.

१४९८ आदिलशहानें बहामनी राज्याकडून गोवा आपल्या ताब्यांत घेतला.

१५१० मध्यें पोर्तुगीज आल्फोंस द अल्बुकर्क यानें गोव्यावर स्वारी केली.

१५६० इन्क्विझिशनची स्थापना.

६ डिसेंबर १६६७ श्रीशिवाजी महाराज आणि पोर्तुगीज यांमध्यें आरमारी करार.

११ डिसेंबर १६८३ संभाजीराजांची गोव्यावर स्वारी.

१७२२ शाहूमहाराज व पोर्तुगीज यांचा करार.

१७३७–३९ पोर्तुगिजांबरोबर मराठ्यांची लढाई.

१८५२ दिपाजी राणे यांचें फिरंग्यांविरुद्ध बंड.

१८९५ दादा राणे यांचें बंड.

मे १९२६ सालाझारी राजवट सुरू.

१८ जून १९४६ डॉ. राममनोहर लोहिया यांचा सत्याग्रह.

१५ ऑगस्ट १९५५ : गोवा विमोचन समितीकडून गोवामुक्ततेसाठीं सामुदायिक सत्याग्रह ( पोर्तुगीज गोळीबार इ. )

१९ डिसेंबर १९६१ (सकाळीं ९ वाजतां) भारतीय सैन्यानें स्वारी करून गोवा मुक्त केला. साडेचारशें वर्षांची परकीय पोर्तुगीज सत्ता नष्ट होऊन गोवा स्वराज्यांत आला.

□ □

## राजकीय

९ डिसेंबर १९६३ गोव्यांत सार्वत्रिक निवडणूक.

दि. ९ डिसेंबर १९६३ रोजीं गोमंतकांत सार्वत्रिक निवडणुका होऊन महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला ( गोवा महाराष्ट्रांत विलीन करावें असें म्हणणाऱ्या पक्षाला ) बहुमत मिळालें.

महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाला १६ जागा, युनायटेड गोवन्स पक्षाला १२ जागा, कॉंग्रेसला एक व अपक्ष एक अशी विभागणी होऊन एकूण ३० सभासदांचें गोव्याचें पहिलें विधिमंडळ तयार झालें.

१९ डिसेंबर १९६३ रोजीं गोव्यांत लोकनियुक्त सरकार स्थापन झालें.

**महाराष्ट्रवादी गोमंतकाचे लोकसभेंतील गोव्याचे खासदार :**

मुरगांव मतदार संघांतून ॲड. मुकुंद शिंक्रे.

पणजी मतदार संघांतून श्री. पीटर अल्वारीस.

आमदार—गोवा, दमण, दीव विधानसभा.

| मतदार संघ | आमदार | पक्ष |
|---|---|---|
| १. सातु इस्तेव्हांव | श्री. दत्तात्रय के. चोपडेकर | म. गो. |
| २. मडकई | श्री. दयानंदराव बांदोढकर | म. गो. |
| ३. फोंडें | ,, गजानन रायकर | प्र. स. |
| ४. शिरोडें | ,, पुंडलीक नायक | म. गो. |
| ५. सांगें | ,, टोनी फेर्नांडीस | ,, |
| ६. काणकोण | ,, गणबा भा. देसाई | ,, |
| ७. केपें | ,, दत्ताराम देसाई | ,, |
| ८. कुडचडें | ,, श्रीरंग करमली | ,, |
| ९. पेडणें | ,, काशिनाथशेट गांवकर | ,, |
| १०. मांद्रे | ,, विजय कामुलकर | ,, |
| ११. शिवोली | ,, पांडुरंगशेट शिरोडकर | ,, |
| १२. म्हापसें | ,, र. आ. टोपले | ,, |
| १३. थिवी | ,, शंभू पालयेंकर | ,, |
| १४. डिचोली | ,, कुसुमाकर कडकडे | म. गो. पुरस्कृत |
| १५. पाली | ,, अच्युत उसगांवकर | ,, |
| १६. सत्तरी | ,, जयसिंगराव राणे | प्र. स. |

**विरोधीपक्ष :**

| | | |
|---|---|---|
| १. पणजी | डॉ. जॅक सिकेरा (विरोधी पक्षनेता) | युनायटेड गो. |
| २. सांतक्रूझ | श्री. ज्योकी लुईश आराऊजु | ,, |
| ३. सांतुआद्रें | श्री. तेओतोनियु पेरैर | यु. गो. |

| | | |
|---|---|---|
| ४. मडगांव | ,, वासुदेव सरमळकर | यु. गो. |
| ५. नावेली | डॉ. आल्व्हास लॉयॉलु फुर्तादु | ,, ,, |
| ६. बाणावली | ,, मावरॅलु फुर्तादु | ,, ,, |
| ७. कुडतरी | श्री. अेनियु पिमेंत | ,, ,, |
| ८. कुंकळ्ळी | डॉ. साबास्तियांत माझारॅलु | ,, ,, |
| ९. मुरगांव | श्रीमती उमिदा मस्कारेन्हाश् | ,, ,, |
| १०. कुडाळी | डॉ. लुईश बाबोज | ,, ,, |
| ११. कलंगूट | श्री. जे. एम्. डिसोझा | ,, ,, |
| १२. हळदोणें | श्री. ऑर्लान्दु लोबु | ,, ,, |
| १३. दमण | श्रीं. कालिदाभाई पटेल | कॉंग्रेस |
| १४. दीव | श्री. महमदअल्ली जिवानी | अपक्ष |

## मंत्रीमंडळ :

**श्री. दयानंदराव बांदोडकर**
मुख्यमंत्री, शासन, अर्थव्यवस्था वगैरे खात्यांचे मंत्री.

**श्री. टोनी फर्नांडिस**
शेती, मजूर, उद्योग, बांधकाम मंत्री.

**श्री. विठ्ठल ऊर्फ श्रीरंग करमळी**
शिक्षण, पर्यटण, आरोग्य, माहिती मंत्री.

श्री ग्रंथ ... प्रकाशक ... क्र. ९३६००

## गोव्यांतील मुख्य शहरें :

| | | | |
|---|---|---|---|
| पणजी | राजधानी | लोकसंख्या | ३५,४६८ |
| मडगांव | सासष्टी तालुक्यांतील मुख्य शहर | ,, | १५,३६४ |
| म्हापसा | बार्देश ,, ,, ,, | ,, | ८,१९८ |
| वास्को (नेहरूनगर) | ,, ,, ,, | ,, | ६,४८३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ...३७८९३... दि: ...
क्रमांक ...३६०... नों दि. २०।५।६९

REFBK 0013670
REFBK-0013670